# ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव

## जाहीर खुली ई-निविदा- (Open Tender) सूचना -१ (प्रथम वेळ)

**ई-निविदा क्र.: ०१/ CONSTRUCTION MATERIAL /२०२६-२७** **दिनांक : ०५/०५/२०२६**

ग्रामपंचायत कार्यालय निमगांव तालुका नांदुरा जिल्हा बुलढाणा येथे१५ वित्त आयोग, जनसुविधा, अनुसूचित जाती व नाव बौद्ध विकास योजना तसेच इतर विविध योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या बांधकामांसाठी ग्रामपंचायतीला निविदेत दिलेल्या दरपत्रक (BOQ) प्रमाणे बांधकाम साहित्य एका वर्षासाठी सन २०२६-२७ किंवा पुढील वर्षाची दर निश्चिती होई पर्यंत दर करार करून खरेदी करणे साठी पुढे नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खुल्या पध्दतीने खालील साहित्य खरेदी करण्यासाठी दर मागवीत आहे.

| अ. क्र. | बांधकाम साहित्याचे नाव | अंदाजित लागणारे साहित्य संख्या | Units |
|---|---|---|---|
| 1 | Cement 43 Packaging Size(Kg): 50kg ISI MARK (UltraTech/ACC/Ambuja/Binani/Birla Corp/L&t/J.K./WONDER) 50 KG BAG (एक बॅग सिमेंट चाच दर देण्यात यावा) | 2000 | NOS/BAG |
| 2 | Cement 53 grade Packaging Size(Kg): 50kg ISI MARK (UltraTech/ACC/Ambuja/Binani/Birla Corp/L&t/J.K./WONDER) 50 KG BAG (एक बॅग सिमेंट चाच दर देण्यात यावा) | 2000 | NOS/BAG |
| 3 | TMT steel rod 6 mm | 150 | Quintal |
| 4 | TMT steel rod 8 mm | 150 | Quintal |
| 5 | TMT steel rod 10 mm | 150 | Quintal |
| 6 | TMT steel rod 12 mm | 150 | Quintal |
| 7 | TMT steel rod 16 mm | 150 | Quintal |
| 8 | TMT steel rod 20 mm | 150 | Quintal |
| 9 | TMT steel rod 25mm | 150 | Quintal |
| 10 | TMT steel rod 32 mm | 150 | Quintal |
| 11 | CEMENT DOOR FRAME STANDARD SIZE | 140 | NOS |
| 12 | CEMENT WINDOW FRAME STANDARD SIZE | 140 | NOS |
| 13 | Fly Ash Cement Bricks ( फक्त एका Bricks (सिमेंट वीट)चा दर द्यावा ब्रास चा दर देण्यात येऊ नये) | 15000 | NOS |
| 14 | क्रशर खडी ग्रेड -१ | 180 | BRASS |
| 15 | क्रशर खडी ग्रेड -२ | 180 | BRASS |
| 16 | क्रशर रेती | 180 | BRASS |
| 17 | मऊ मुरूम | 150 | BRASS |
| 18 | हार्ड मुरूम | 150 | BRASS |
| 19 | ११.२mm क्रशर खडी | 180 | BRASS |
| 20 | पेव्हर ब्लॉक 60 mm thick | 10000 | BRASS |
| 21 | पेव्हर ब्लॉक 80 mm thick | 10000 | BRASS |
| 22 | 80 MM गिट्टी | 180 | BRASS |
| 23 | 40 MM गिट्टी | 180 | BRASS |
| 24 | 20 MM गिट्टी | 180 | BRASS |
| 25 | 12 MM गिट्टी | 180 | BRASS |
| 26 | 10 MM गिट्टी | 180 | BRASS |
| 27 | 6 MM गिट्टी | 180 | BRASS |
| 28 | रेती | 180 | BRASS |
| 29 | वीट -माती ( फक्त एका मातीच्या विटी चा दर द्यावा ब्रास चा दर देण्यात येऊ नये) | 45000 | NOS |

सदर साहित्याचे दर हे सर्व प्रकारचे वाहतूक भाडे मजुरी व रॉयल्टी तसेच करांसहित ई-निविदा दर मागवीत आहे. वरील नमूद केलेले साहित्य हे अंदाजित असल्यामुळे एका साहित्याच्या एका नागाचे दर निश्चित करावयाचे असल्याकारणाने सदर साहित्याचे प्रती नगा नुसार तसेच प्रती ब्रास /प्रती बॅग नुसार दर सादर करण्यात यावे . सादर होणाऱ्या दरानुसार ग्रामपंचायतीचे आवश्यकते नुसार खरेदी करण्यात येईल **(उदा. ग्रामपंचायतीने वरील पैकी फक्त एकच प्रकारचा एकच सिमेंट बॅग पुरवठा करण्यास सागीतल्यास एकच सिमेंट बॅग संबंधित पुरवठादार/कंत्राटदार यांना पोच करून द्यावा लागेल हि अट मान्य असने बंधनकारक आहे आणि या अटी वरच सदर निविडेचा पुरवठा आदेश देण्यात येईल सदर अट मान्य असल्यासच निविदा भरावी .)**

ग्रामपंचायत निमगांव वतीने सरपंच/सचिव हे सदरची निविदामागवित आहेत, तसेच खरेदीदार म्हणून सरपंच/ सचिव यांनी सदर निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर ऐनवेळी बदल करण्याचे किंवा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहेत.

सदर निविदेबाबत कुठलाही वाद उद्भवत असल्यास अंतिम निर्णय हा ग्रामपंचायत सरपंच/ सचिव यांचा राहील, तसेच सदर निविदेबाबत न्यायालयीन जिल्हा क्षेत्र हे बुलडाणा राहील.

Vikas Mukunda Shivde
Digitally signed by Vikas Mukunda Shivde
Date: 2026.05.05 13:46:34 +05'30'

**सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय निमगांव**

VIKAS PANDHARI INGLE
Digitally signed by VIKAS PANDHARI INGLE
Date: 2026.05.05 13:46:49 +05'30'

**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय निमगांव**

कंत्राटदाराची/पुरवठादाराची डिजिटल स्वाक्षरी



ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव

## सर्व सामान्य सूचना

**१. ई निविदा प्रक्रियेशी संबंधित तारखा :**

| अ.क्र. | विवरण | तारीख | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **निविदा प्रसिद्ध करण्याचा दिनांक** | ०५/०५/२०२६ | १६.०० |
| २. | **निविदा डाउनलोड सुरु करण्याचा दिनांक** | ०५/०५/२०२६ | १६.०० |
| ३. | **निविदा स्वीकार करण्याचा आरंभ दिनांक** | ०५/०५/२०२६ | १६.०० |
| ४. | **निविदा स्वीकृतीचा अंतिम दिनांक** | १३/०५/२०२६ | १८.५५ |
| ५. | **निविदा उघडण्याचा दिनांक** | १५/०५/२०२६ | १४.०० |

२. **निविदा भरण्याची पद्धत :**
**सदरची निविदा महाराष्ट्र शासनाच्या** https://mahatenders.gov.in या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने डिजिटल स्वाक्षरी वापरून भरवायची/अपलोड करावयाची आहे.

३. वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाइन करण्यात येईल या निविदे संबंधित या पुढील सर्व सूचना/ शुद्धीपत्रके ई-निविदे मार्फत ऑनलाईन करण्यात येतील.

४. **निविदा उघडण्या संदर्भात महत्वाची सूचना :** निविदा हि दिलेल्या दिनांकास उघडणे शक्य न झाल्यास समितीच्या सोयीनुसार उघडण्यात येईल तसेच निविदा उघडण्याच्या तारखेत ऐनवेळी बदल झाल्यास तशी सूचना फक्त ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर लावण्यात येईल त्यासाठी शुद्धिपत्रक देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी

### *तांत्रिक लिफाफा अटी व शर्ती*

१. नोंदणीकृत कंत्राटदार/पुरवठादारा कडून त्यांचे नोंदणी संबंधीचे सर्व कागदपत्रे उदा. तांत्रिक लिफाफा , GST CIRTIFICATE, अनामत रक्कम/ निविदा फी रकमेची पावती, सर्व आवश्यक लायसन्स तसेच वरील कागदपत्रांसोबातच इतर कागदपत्रे पीडीएफ स्वरुपात एकाच फाईल मध्ये सर्व कागदपत्रांवर डिजिटल स्वाक्षरी सह तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अत्यावश्यक आहे. टीप : काही कंत्राटदार हे फक्त एकाच फाईल ला एकच डिजिटल स्वाक्षरी करून निविदा भरतात अश्या निविदा अपात्र ठरविण्यात येतील पीडीएफ मधील सर्व कागद पात्रांवर डिजिटल स्वाक्षरी असणे बंधनकारक राहील.

२. कंत्राटदाराने आपले दर हे सर्व कर/उपकर (GST-CGST/SGST/IGST AND ETC.) तसेच साहित्य पोच करण्यासाठी लागणारे वाहन भाडे/ प्रवास भाडे यांसह फक्त निविदे सोबत जोडलेल्या BOQ या दरपत्रका मध्येच नमूद करावेत. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या दराव्यातिरिक्त कुठल्याही प्रकारचे देयक अदा करण्यात येणार नाही.(उदा. गॅरंटी पिरीयड मध्ये कोणत्याही प्रकारचे साहित्य दुरुस्त/बदलून/पर्यायी व्यवस्थे साठी लागणारे कोणतेही देयक अदा करण्यात येणार नाही) याची नोंद घ्यावी.

३.

**अ.** निविदा फी/ शुल्क रु. २०,०००/- व अनामत रक्कम / EMD रक्कम रु. २,००,०००/-

**आ.** शासन निर्णय क्रमांक :भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-IIIउद्योग -४, उद्योग उर्जा व कामगार विभाग संकेतांक क्र. 201612021708269510 महाराष्ट्र शासन दिनांक ०१/१२/२०१६ नुसार सदर रक्कम भरण्यास MSME /सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम -२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून १०० टक्के सुट देण्यात येत आहे सदर नोंदणी असलेल्या कंत्राटदार यांना सुद्धा सदर सूट लागू करण्यात आलेली आहे त्यांनी पुढील रक्कम जमा करावी निविदा फी मध्ये २०,००० रुपयांची सूट अनामत रक्कममध्ये २,००,०००/- रुपयांची सूट राहील तसेच MSME /सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम -२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणी नसलेल्या सर्व कंत्राटदार यांना निविदा शुल्क व अनामत रक्कम पूर्ण भरावी लागेल याची नोंद घ्यावी

**इ.** सदर रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतीचे बँक खाते लिंक केलेले असल्याने ग्रामपंचायत च्या दिलेल्या खात्यात RTGS/NEFT / ऑनलाइन प्रणाली द्वारे भरून निविदा फी व अनामत रक्कम भरणा केल्याबाबतची पावती स्कॅन करून तांत्रिक लिफाफ्यात सादर करावी,सदर EMD फी सर्वात शेवटी दिलेल्या वर्क ऑर्डर ची पूर्तता करून त्या साहित्याची गॅरंटी पिरीयड संपल्यानंतरच अदा करण्यात येईल, त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

४. नोंदणीकृत कंत्राटदार/ पुरवठाधारकाकडे महाराष्ट्र शासनाचे पंजीकृत प्रमाणपत्र, GST नोंदणी, INCOME TAX RETURN 2021-22, 2022-23,2023-24 AY सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये नवीन नोदणी झालेल्या कंत्राटदार / पुरवठादार यांना INCOME TAX RETURN पासून सूट देण्यात येत आहे मात्र सदर पुरवठा करणारे उत्पादक व पुरवठादार हे दोन्हीही GST प्रमाणित असणे बंधनकारक राहील त्यासाठी सदर प्रमाणपत्र अपलोड केलेले असणे अत्यावश्यक आहे.

५. निविदा मंजूर झाल्यास वर्क ऑर्डर मधील अटी व शर्ती नुसार कामे पूर्ण करावे लागतील न केल्यास अनामत रक्कम ग्रामपंचायतीला जप्त करण्यात येऊन ग्रामपंचायतीच्या योग्य निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

६. **कुठल्याही परिस्थितीत/ पद्धतीत/ प्रकारे अग्रिम (ADVANCE) मिळणार नाही.**

**अ. सदर साहित्य ग्रामपंचायतीला आणण्यासाठी जो काही खर्च येईल तो** कंत्राटदार/पुरवठाधारक यांना स्वतः करावा लागेल त्यासाठी ग्रामपंचायत कडून कुठल्याही प्रकारचे वाहन भाडे/ प्रवास भाडे देण्यात येणार नाही.

**आ.** ग्रामपंचायतीला पोच झालेल्या साहित्य बाबत शंका निर्माण होत असेल त्या वेळेस सदर साहित्याची पडताळणी (QUALITY CONTROL) करण्या साठी जो काही खर्च येईल तो सर्व खर्च कंत्राटदार/पुरवठाधारक यांनाच करावा लागेल. तसेच साहित्याची पडताळणी (QUALITY CONTROL) मध्ये सदर साहित्य निकृष्ठ/ उत्तम दर्जाचे नसल्याबाबत प्रमाणपत्र/ किंवा संबंधीत विभागाचे पत्र प्राप्त झाल्यास सदर साहित्य बदलून द्यावे लागेल त्यासाठी कुठल्याही प्रकारचे वेगळे देयक अदा करण्यात येणार नाही.

काम उत्तम दर्जाचे असणे अत्यावश्यक असल्याकारणाने साहित्याची रॉयल्टी, GST, व इतर सर्व कर भरण्याची जबाबदारी हि संबंधीत कंत्राटदार/पुरवठादार यांची राहील त्यानुसारच साहित्याचे दर नमूद करावेत.

७. आपली निविदा स्वीकृत झाल्यास सदर साहित्याची १ वर्षाची गॅरंटी/देखभाल दुरुस्तीबाबतचा करारनाम्यात उल्लेख करावा.

८. सदर १ वर्षाची गॅरंटी हि वर्क ऑर्डर दिल्या नंतर साहित्य ज्या तारखेला ग्रामपंचायतीला किंवा ग्रामपंचायतीने ज्या स्थळावर सुरु करून देण्यास सांगितले असेल त्या स्थळावर पोच करून तसेच ते सुरळीत सुरु करून दिल्यानंतर तो आणि त्यानंतर चा एक दिवस वगळून त्या नंतरच्या दिवसापासून ग्राह्य धरण्यात येईल.

(उदा.: साहित्य पोच बाबत वर्क ऑर्डर दिनांक १५/०१/२०२६ला दिली असेल त्यानंतर सदर साहित्य दिनांक ३०/०१/२०२६ला ग्रामपंचायतीने ज्या स्थळावर सुरु करून देण्यास सांगितले असेल त्या स्थळावर पोच झाले परंतु दिनांक ०१/०२/२०२६ला सदर साहित्य व्यवस्थित रित्यासुरु करून दिले तर सदर साहित्याचा गॅरंटी कालावधी हा दिनांक ०२/०२/२०२६ ते ०२/०२/२०२७ पर्यंत असेल.)

९. **गॅरंटी पिरीयड मध्ये सदर साहित्यामध्ये कुठल्याही प्रकारे (तांत्रिक बिघाड/ तुटफुट) बिघाड झाल्यास** कंत्राटदार/पुरवठादार यांना कळविल्या पासून **जास्तीत जास्त३० दिवसांचे आत** सदर साहित्य दुरुस्त किंवा बदलून द्यावे लागेल सदर साहित्य दुरुस्त करण्यास वेळ लागत असल्यास सदर साहित्याची पर्यायी व्यवस्था सुद्धा करावी लागेल त्यासाठी कुठल्याही प्रकारचे देयक अदा करण्यात येणार नाही, हि संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदार / पुरवठाधारक यांची राहील.

१०. **निर्धारित नुकसान भरपाई :** जर कंत्राटदार/पुरवठाधार निविदेमध्ये नमूद केल्यानुसार बंधपत्र (करारनामा) कागदपत्रे, उपकरणांची तपासणी, त्यांचे इंस्टॉलेशन, त्याबाबतचे प्राशिक्षण इ.बाबी वेळोवेळी मागणी केल्याप्रमाणे उपलब्ध करून देण्यास/करण्यास असमर्थता दाखविल्यास खरेदीदारास निविदा कालावधीपर्यंत कंत्राटदार/पुरवठाधारकाचे देयक रोखण्याचा पूर्ण अधिकार असेल आणि अशा विलंबास कोणत्या प्रकारचे दंड व शास्ती करावी याबाबतचे पूर्ण अधिकार सरपंच/ सचिव यांना असतील.

११. **करार समाप्त करणे: पुढील परिस्थितीत ग्रामपंचायातीस अंशतः किंवा पूर्णतः करार समाप्त करण्याचा पूर्ण अधिकार असेल**

- निर्धारित पुरवठा करण्याच्या तारखेनंतरही १५ दिवसापर्यंत उपकरणांचा पुरवठा न केल्यास अथवा साहित्यात बिघाड असतांना दुरुस्त/ बदलून न दिल्यास.
- प्रणाली सुरळीत सुरु करण्याच्या निर्धारित तारखेनंतरही १५ दिवसापर्यंत प्रणाली सुरु न केल्यास/ झाल्यास.
- कंत्राटदार/पुरवठाधारकाने दिवाळखोरी जाहीर केल्यास.
- लवादाने दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून.
- पुरवठा केलेली उपकरणेही विहित मानांकाचे उल्लघन करणारी, डुप्लिकेट, तकलादू असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तांत्रिक परीक्षणास अपात्र झाल्यास.
- **गॅरंटी पिरीयड मधील सेवा देण्यास अथवा वरील अटी प्रमाणे असमर्थ ठरल्यास.**
- ज्यावेळी पूर्णतः समाप्त अथवा संपुष्ठात आणण्यात येईल त्यावेळी कंत्राटदार/पुरवठाधारक यांचे कडून घेतलेली सुरक्षा ठेव/ अनामत रक्कम/ बयाना रक्कम/ EMD जप्त करण्यात येईल आणि कंत्राटदार/पुरवठाधारकास अशा रक्कमेवर कोणताही दावा सांगण्याचा हक्क असणार नाही. तसेच त्याच्या देयकाची पूर्ण रक्कम/ उर्वरित कुठल्याही प्रकारची रक्कम अदा करण्यात येणार नाही.

१२. उपरोक्त निर्देशित अटी,शर्ती मध्ये कुठलाही बदल/ दुरुस्ती केल्यास संबंधित कंत्राटदार/पुरवठाधारकास निविदा प्रक्रीये मध्ये अपात्र घोषित करण्यात येईल.उपरोक्त निर्देशित अटी,शर्तीला अधीन असल्याबाबातचे करारपत्र ५००/- रु.चे स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञा पत्रात (AFFIDAVIT) करून/ लिहून द्यावे लागेल. त्या मध्ये निविदेचे नाव व टेंडर आयडी चा उल्लेख असणे आवश्यक आहे, उपरोक्त अटींना अधीन राहून इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदार/पुरवठाधारकांनी आपल्या निविदा सादर कराव्यात .

**टीप:**

1. **निविदेत सादर होणाऱ्या सर्व कागदपत्रांवर निविदा प्रसिद्ध झाल्या पासून निविदा सादर करण्याच्या काळातील/कालावधीतील डिजिटल स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे अन्यथा निविदा अपात्र घोषित करण्यात येईल.**
2. **वरील सर्व अटी व शर्ती नुसार अट शिथिल करणे व वाढविणे बाबतचा ग्रामपंचायतीने घेतलेला निर्णय हा अंतिम राहील. तसेच सदर निविदे बाबत सर्व अधिकार (कुठलीही निविदा स्वीकारणे /नाकारणे) हे ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.**

Vikas Mukunda Shivde — Digitally signed by Vikas Mukunda Shivde Date: 2026.05.05 13:47:05 +05'30'

VIKAS PANDHARI INGLE — Digitally signed by VIKAS PANDHARI INGLE Date: 2026.05.05 13:47:17 +05'30'

**सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय निमगांव**

**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय निमगांव**

Signature Not Verified
Digitally signed by VIKAS PANDHARI INGLE
Date: 2026.05.05 13:50:05 IST
Location: Maharashtra-MH

ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव